16-6-1986

-283-

विषयः- गांवठाण विस्तार व ग्रामीण बेघर भूमिहीनांना घरकुले बांधून देण्यांची योजना राबविण्यांसाठी खाजगी जमिनीचे संपादन करण्यांबाबत ...

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांकः जीटीएन/१०८६/४०७४/३४३७/र-१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक १६ जून १९८६.

शासन परिपत्रकः-

गांवठाण विस्तार योजना तसेच ग्रामीण भागांतील बेघर भूमिहीनांना घरकुले बांधून देणे या योजना कार्यान्वित करण्यांसाठी जमिनीची आवश्यकता असते. या कार्यक्रमासाठी प्रथमतः सरकारी अथवा ग्रामपंचायतीच्या योग्य जमिनी सदर प्रयोजनासाठी उपलब्ध नसतात त्यावेळी खाजगी मालकीच्या जमिनी संपादित करण्यांत येतात. नव्या २० कलमी सामाजिक/आर्थिक कार्यक्रमाच्या संनियंत्रण व पुनर्विलोकनासाठी नेमण्यांत आलेल्या महसूल व वन विभागाच्या समितीची बैठक दिनांक १५-५-१९८६ रोजी घेण्यांत आली होती. त्यावेळी शासनाच्या असे निदर्शनांस आणण्यांत आले की, गांवठाण विस्तार व घरकुले बांधणीच्या कार्यक्रमासाठी जेव्हा सरकारी जमिनी उपलब्ध होत नाहीत तेव्हा खाजगी मालकीच्या जमिनी घेण्यांत येतात. तथापि असे करताना ब-याच प्रकरणांत एकाच मालकाच्या जमिनी पुन्हा पुन्हा संपादित करण्यांत येतात. परिणामतः त्यांच्यावर अन्याय होतो.

वरील परिस्थिती लक्षांत घेऊन शासन असे आदेश देत आहे की, गांवठाण विस्तार व घरकुल योजना राबविण्यांसाठी ज्या ज्या वेळी सरकारी अथवा ग्रामपंचायतीच्या जमिनी उपलब्ध न झाल्यामुळे खाजगी मालकीच्या जमिनी संपादित करण्यांत येतात, त्यावेळी गांवठाण विस्तारासाठी एकापेक्षा अधिक खाजगी जमीनी उपयुक्त असल्यास, शक्यतोपर्यंत त्या जमीन मालकाची जमीन संपादन करु नये ज्यांची जमिनी यापूर्वीच दुस-या सार्वजनिक प्रयोजनासाठी करण्यांत आलेली आहे. फक्त दुसरी उपयुक्त व योग्य खाजगी नसली तरच एकाच मालकाकडून जमिनीचे पुनःश्च संपादन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(द. तु. पाडावे,)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,